Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

Original Article

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीतील नेतृत्त्वगुण व तत्त्वांचा स्टार्टअप्सच्या विस्तारासाठी वापर: 'स्वराज्य ते स्केलअप' एक संकल्पनात्मक अभ्यास

**डॉ. वृषाली वसंतराव बर्गे**
सहाय्यक प्राध्यापक, संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
**Email:** vrushalivb2020@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-171107
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 11(A)
Pp. 36-46
November. 2025

**Submitted:** 15 Oct. 2025
**Revised:** 25 Oct. 2025
**Accepted:** 10 Nov. 2025
**Published:** 30 Nov. 2025

***सारांश***

*छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्व गुणांवर आधारित असलेला हा संकल्पनात्मक शोध-अभ्यास, त्यांच्या काळातील प्रजा-केंद्रीत मराठा साम्राज्याच्या स्थापनेत त्यांच्या रणनीतिक सैन्य कौशल्य, दूरदर्शी दृष्टिकोण आणि लोककेंद्रित शासनाच्या भूमिकेवर प्रकाश टाकतो. महाराजांचा वारसा आजही प्रेरणादायक आहे आणि त्यांच्या नेतृत्व तत्त्वांचा आधुनिक स्टार्टअप्सच्या वृद्धी आणि शाश्वत विकासाकरिता कसा उपयोग करता येईल, हे या अभ्यासात तपासले आहे. या शोधनिबंधात महाराजांच्या धैर्य, दूरदृष्टी, निर्णयिकता आणि सार्वजनिक कल्याणासाठी समर्पण या प्रमुख नेतृत्व गुणांचा आजच्या स्टार्टअप इकोसिस्टममध्ये कसा उपयोग करता येईल, हे स्पष्ट केले आहे. नवीन व्यवसाय उपक्रम म्हणून स्टार्टअप्सना भांडवल उभारणे, बाजार स्पर्धा, तंत्रज्ञानातील प्रगती आणि संसाधन व्यवस्थापनासारख्या आव्हानांचा सामना करावा लागतो. या आव्हानांवर मात करण्यासाठी आणि टिकाऊ व्यवसाय वाढ साध्य करण्यासाठी, महाराजांच्या नेतृत्व मॉडेलवर आधारित एक संकल्पनात्मक चौकट प्रस्तावित केली आहे.अभ्यासात दाखवण्यात आले आहे की महाराजांची नेतृत्व तत्त्वे आधुनिक उद्योजकांसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांच्या गनिमी युद्ध तंत्र, किल्लेबंदी, आणि प्रशासकीय सुधारणांचा अभ्यास करून आपल्याला मर्यादित संसाधनांद्वारे देखील मोठे उद्दिष्ट साधता येतात, हे* शिकण्यासारखे आहे. *महाराजांच्या स्वराज्य आणि आजच्या स्टार्टअप्समधील समान धागा शोधून, हा अभ्यास दर्शवतो की रणनीतिक विचार, नवकल्पनात्मक समस्या सोडवणे आणि समुदाय सहभाग या तत्त्वांचा वापर करून यशस्वी स्टार्टअप्स संकल्पनात्मक दृष्ट्या उभारला जावू शकतो. या अभ्यासाचा उद्देश छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक यशावर आधारित एक नेतृत्व मॉडेल विकसित करणे आहे, जे आधुनिक उद्योजकांसाठी मार्गदर्शक म्हणून कार्य करू शकेल. अनुकूलता, नवीन विचार आणि लोककेंद्रित दृष्टिकोण यांचे महत्त्व अधोरेखित करणारे हे मॉडेल, शिवाजी महाराजांच्या शासन आणि सैनिकी रणनीताचा मुख्य गाभा होता. भूतकाळातील नेतृत्व, तत्त्वे आणि आजच्या स्टार्टअप इकोसिस्टमच्या गरजांमधील समानता दर्शवून, हा शोधनिबंध स्टार्टअप्ससाठी दीर्घकालीन यश आणि "स्वराज्य ते स्केलेबिलिटीसाठी" एक नवीन दृष्टिकोन सार्वत्रीक करण्याचा प्रयत्न करतो.*

***शोध/संकेत शब्द (कीवर्डस्)***: *छत्रपती शिवाजी महाराज, युद्धनीती, स्टार्टअप्स, स्वराज्य, स्केलअप, संकल्पनात्मक अभ्यास.*

## परिचय

### छत्रपती शिवाजी महाराजांचे ऐतिहासिक महत्व

छत्रपती शिवाजी महाराज हे भारतीय इतिहासातील एक अभूतपूर्व व्यक्तिमत्व आहेत. ज्यांनी 17व्या शतकात मराठा साम्राज्याची स्थापना करून तत्कालीन मुगल सत्तेला प्रभावीपणे आव्हान दिले.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. वृषाली वसंतराव बर्गे , सहाय्यक प्राध्यापक, संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ*

**How to cite this article:**
*बर्गे, . वृषाली . वसंतराव . (2025). छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीतील नेतृत्त्वगुण व तत्त्वांचा स्टार्टअप्सच्या विस्तारासाठी वापर: 'स्वराज्य ते स्केलअप' एक संकल्पनात्मक अभ्यास. Journal of Research and Development, 17(11(A)), 36–46. https://doi.org/10.5281/zenodo.17866128*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17866128

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

त्यांच्या नेतृत्त्वाखाली, एक संगठित आणि शक्तिशाली राज्य त्यांनी निर्माण केले, ज्यामध्ये समतामुलक प्रशासन, युद्धनीती आणि प्रजा-कल्याणकारी राजकीय दृष्टिकोण यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. छत्रपती शिवाजी महाराज हे भारतीय इतिहासात एक महान योद्धा आणि दूरदृष्टी असलेले राजे व स्वराज्य रणनितीकार म्हणून ओळखले जातात. त्यांच्या नेतृत्त्वगुणांमध्ये धैर्य, दूरदृष्टी, व्यापक निर्णयक्षमता आणि जनतेच्या कल्याणासाठी समर्पणाचा अंतर्भाव होता. त्यांनी आपल्या साम्राज्याची उभारणी करताना रयतेला केंद्रस्थानी ठेवून, स्वराज्याच्या संकल्पनेची मुहुर्तमेठ रोवली, ज्यामुळे त्यांचे ऐतिहासिक आणि एक कल्याणकारी राज्यकर्ता म्हणून अद्वितीय महत्त्व आहे. त्यांच्या लष्करी कौशल्य, दूरदृष्टी, आणि स्वराज्याच्या स्वप्नामुळे ते आजही एक आदर्श नेतृत्त्वाचे प्रतीक म्हणून मानले जातात. शिवाजी महाराजांनी केवळ शून्यातून साम्राज्य उभारले नाही, तर स्वराज्याच्या संकल्पनेची रुजुवात केली, ज्यामुळे त्यांच्या नेतृत्वगुणांनी त्यांच्या अनुयायांमध्ये एक अनोखा बंधुभाव निर्माण केला आणि त्यांना निरंतर प्रेरणा दिली. *(देसाई, आर., 2024)*

**आधुनिक स्टार्टअप्स आणि त्यांची आव्हाने:**

स्टार्टअप म्हणजे एक नावीन्यपूर्ण व्यावसायिक उपक्रम असतो जो नवीन कल्पना, तंत्रज्ञान किंवा व्यवसाय मॉडेलवर आधारित असतो. याचा मुख्य उद्देश बाजारात जलद गतीने वाढणे आणि प्रामुख्याने नावीन्यपूर्ण उत्पादने किंवा सेवांची निर्मिती करणे हा असतो. स्टार्टअप्स सामान्यतः उच्च-वृध्दीच्या बाजारपेठेत कार्यरत असतात आणि त्यात नवीनता, जलद वाढ, जोखिम पत्करण्याची तयारी आणि अखंड उद्योजकता यासारखी वैशिष्ट्ये असतात. कमी भांडवलाच्या आधारे मोठी कल्पना साकार करण्याची त्यांची क्षमता हे त्यांचे वैशिष्ट्य आहे *(Grant, M., 2024).*

स्टार्टअप सुरू करण्यासाठी पुढील काही गोष्टींची आवश्यकता असते:

1. **एक चांगली कल्पना**: स्टार्टअपची सुरुवात एका चांगल्या कल्पनेपासून होते. ही कल्पना एखाद्या समस्येचे निराकरण करण्यासाठी, ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी किंवा बाजारपेठेत एक नवीन उत्पादन किंवा सेवा आणण्यासाठी असू शकते.
2. **बाजारपेठेचे संशोधन**: कल्पनेची व्यवहार्यता तपासण्यासाठी आणि स्पर्धेचे मूल्यांकन करण्यासाठी बाजारपेठेचे संशोधन करणे आवश्यक आहे.
3. **व्यवसाय योजना**: स्टार्टअपचे ध्येय, उद्दिष्टे, उत्पादने, सेवा, विपणन योजना, आर्थिक अंदाज आणि व्यवस्थापन टीम यांचा समावेश असलेली एक व्यवसाय योजना तयार करणे आवश्यक असते.
4. **निधी उभारणी**: स्टार्टअप सुरू करण्यासाठी आणि चालवण्यासाठी निधीची आवश्यकता असते. हा निधी वैयक्तिक बचत, मित्रपरिवार, देवदूत गुंतवणूकदार, उद्यम भांडवलदार किंवा बँक कर्जाद्वारे उभारला जाऊ शकतो.
5. **कायदेशीर बाबींची पूर्तता**: व्यवसाय नोंदणी, परवाने आणि परवानग्या मिळवणे आणि इतर कायदेशीर आवश्यकता पूर्ण करणे आवश्यक आहे.
6. **संघ निर्माण करणे**: स्टार्टअपसाठी एक सक्षम आणि समर्पित संघ तयार करणे आवश्यक आहे.

आधुनिक स्टार्टअप्स मधे नावीन्यपूर्ण उद्योग सुरु करून त्यांचे 'मोठ्या प्रमाणाचा व्यवसाय' (लार्ज स्केल बिझनेस) व्यापारिक रूपात विस्तारणे आणि निरंतर शाश्वत वाढ साध्य करण्याच्या दिशेने प्रयत्नशील असणे. तथापि, या स्टार्टअप्सना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते, जसे की भांडवल उभारणी, बाजारातील स्पर्धा, तांत्रिक प्रगती, अद्यावत तंत्र सामग्रीयुक्त कार्यालय आणि संसाधनांचे प्रभावी व्यवस्थापन व संचालन. यातील सर्वात मोठे आव्हान मानले जाते- व्यवसायाची शाश्वतता आणि सखोल मोठ्या विस्ताराचे प्रमाण आणि व्यावसायिक गती प्राप्त करणे, जे एका छोट्या स्तरावरून जागतिक स्तरावर पोहोचण्याचे उद्दिष्ट ठरते.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात, स्टार्टअप्सची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. स्टार्टअप्स प्रामुख्याने नवे उत्पादन किंवा सेवांना बाजारात आणण्यासाठी उभारलेले छोटे उद्योग असतात. हे उद्योगाच्या सुरुवातीच्या टप्प्यातून प्रगती करुन- तीव्र स्पर्धा, बदलती बाजारपेठ, निधी उभारणे, ग्राहक टिकवून सातत्याने वाढवत ठेवणे आणि शाश्वत विस्तार साध्य करणे यासारख्या अनेक आव्हानांना पेलवत मोठ्या उद्योगात रुपांतरीत केली जातात. या सर्व आव्हानांचा सामना करताना, आधुनिक स्टार्टअप्सना एका दृढ नेतृत्त्वाची आवश्यकता असते.

**संशोधनाचा उद्देश्य, महत्त्व आणि प्रासंगिकता:**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीतींचा अभ्यास करून, स्टार्टअप्स त्यांच्या रणनीतींमध्ये लवचिकता आणि नवकल्पना कशा पद्धतीने समाविष्ट करू शकतात, ही संकल्पनात्मक संहिता समजून घेणे आवश्यक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

नेतृत्त्वगुणांचा आणि तत्त्वांचा आधुनिक स्टार्टअप्सच्या नियमीत आणि शाश्वत प्रगती करिता कसा वापर करता येईल, याचा प्रामुख्याने संकल्पनात्मक दृष्टया अभ्यास करणे हा या शोधनिबंधाचा प्राथमिक उद्देश्य आहे. तसेच महाराजांच्या ऐतिहासिक कामगिरीच्या आधारावर एक प्रभावी संकल्पनात्मक नेतृत्व 'मॉडेल' (साचा) तयार करण्याचा, या अभ्यासाचा हेतू आहे. जे आजच्या उद्योजकांना त्यांच्या दीर्घकालीन व्यापारिक वृद्धी करिता प्रामुख्याने मार्गदर्शक ठरेल तसेच व्यवसायाच्या दिर्घ व्यापकतेकरिता आवश्यक असलेल्या कौशल्यांचा विकास करण्यास मदत होईल.महाराजांची युद्धनीती आणि आधुनिक स्टार्टअप्स यांच्यातील सामायिक धागे शोधणे हा केवळ एक ऐतिहासिक अभ्यास नाही तर आधुनिक उद्योजकांसाठी प्रेरणादायी आणि पथदर्शक सिद्ध होऊ शकतो का याचेही परिक्षण आहे.

या संशोधनासाठी, छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती आणि आधुनिक स्टार्टअप्सच्या वाढी या दोन भिन्न क्षेत्रांवरील विविध साहित्याचा अभ्यास करण्यात आला. शिवाजी महाराजांच्या जीवनावर आणि त्यांच्या युद्धनीतीवर अनेक इतिहासकारांनी विस्तृत संशोधनात्मक लेखन तथा निरीक्षण नोंदवलेले आहे. या संशोधनात त्यांच्या नेतृत्वगुणांवर, व्यवस्थापकीय रणनीतिक कौशल्यांवर आणि त्यांच्या यशस्वी मोहिमांच्या पाठीमागच्या कारणांवर भर दिलेला आहे. याचबरोबर, आधुनिक काळात स्टार्टअप्सच्या वाढीसाठी लागणाऱ्या विविध रणनीतींवरही अनेक पुस्तके, शोधनिबंध आणि लेख लिहिले गेले आहेत. यात ग्राहक विकास, लीन स्टार्टअप्स, कॅनव्हास व्यवसाय मॉडेल आणि इतर अनेक संकल्पनांचा समावेश आहे.

**संकल्पनात्मक दृष्टया तुलना का?**

- **ऐतिहासिक ज्ञानाचे आधुनिक अनुप्रयोग:** छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीतील सिद्धांतांना आधुनिक व्यवसायाच्या संदर्भात समजून घेणे ही केवळ ऐतिहासिक जिज्ञासा नाही तर आधुनिक समस्यांसाठी नवीन दृष्टिकोण शोधण्याचा प्रयत्नात्मक दृष्टिकोण आहे.
- **नेतृत्व गुणांची सार्वत्रिकता:** महाराजांचे नेतृत्वगुण काळाच्या पलीकडले आहेत. ते आजही प्रासंगिक आहेत आणि उद्योजकांना प्रेरणा देऊ शकतात अशी मांडणी व्यवसाय तज्ञ मंडळींनी वेळोवेळी केलेली आहे.
- **अनपेक्षित सामायिक धागे:** दोन भिन्न कालखंडातील आणि क्षेत्रातील घटनांमध्ये असलेले अनपेक्षित सामायिक धागे शोधणे हे या अभ्यासाचे आणखी एक उद्दिष्ट आहे. इतिहास स्वत:ला पुनरावृत्तीत करतो *(हिस्ट्री रिपीट्स इटसेल्फ)* ही एक सामान्य म्हण आहे. भूतकाळातील ऐतिहासिक प्रेरणादायी घटनेतून मानवी संस्कृती अधिक अधिक प्रग्लभ होत असते याची अनेक उदाहरणे मानवीय सभ्यतेत आहेत.

**अभ्यासाचे महत्त्व:**

- **उद्योजकांसाठी मार्गदर्शक:** महाराजांच्या जीवनातून मिळणारे धडे आधुनिक उद्योजकांना त्यांच्या स्टार्टअप्सचा विस्तार करण्यासाठी मार्गदर्शन करू शकतात.
- **ऐतिहासिक ज्ञानाचे मूल्य:** महाराजांच्या कार्याचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित करणे.
- **नवीन दृष्टिकोण:** आधुनिक व्यवसायातील समस्या सोडवण्यासाठी नावीन्ययुक्त आणि अनपेक्षित दृष्टिकोण शोधणे.

**संशोधन पद्धती:**

सदरील संकल्पनात्मक शोधनिबंधात छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीतील प्रमुख तत्त्वांचे व नेतृत्वगुणाचे तर्कबद्ध विश्लेषण करून, त्यांचा स्टार्टअप्सच्या व्यापक विकासात्मकते करिता वापर होऊ शकतो याबाबत तार्कीक व सुचीबद्ध अन्वेषण केले आहे. या संशोधनासाठी गुणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. शिवाजी महाराजांच्या जीवनावर आणि कार्यावर लिहिलेले इतिहासकारांचे लेख, ग्रंथ आणि आत्मचरित्रांचा सखोल अभ्यास अंतर्भूत केला आहे. याशिवाय, आधुनिक स्टार्टअप्सच्या यशस्वी कथांचाही समावेश करुन महाराजांच्या युद्धनीतीतील नेतृत्त्वगुण व तत्त्वांचा स्टार्टअप्सच्या विस्तारासाठी संकल्पनात्मक दृष्टया कसा वापर केला जाऊ शकतो या संदर्भात मांडणी केली आहे. या दोन्ही क्षेत्रांमधील साधर्म्य आणि फरक शोधून काढण्याचा प्रयत्न अंतर्भूत असेल.

**संकल्पनात्मक चौकट:**

हे संशोधन शिवाजी महाराजांच्या युद्धनीती आणि स्टार्टअप्सच्या वाढीमधील समांतरता दाखवणारी एक संकल्पनात्मक चौकट मांडते. गनिमी युद्ध, परिस्थितीनुसार निर्णय घेण्याची, क्षणात बदलण्याची क्षमता, विकेंद्रित निर्णय प्रक्रिया, आणि गुप्तचर संकलन यासारख्या महाराजांच्या युद्धनीतीतील तत्त्वांचा स्टार्टअप्सच्या संदर्भात कसा उपयोग होऊ शकतो हे या चौकटीतून स्पष्ट केले जाईल.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

- **ऐतिहासिक ज्ञानाचा वापर:** इतिहासातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्त्वातून प्रेरणा घेऊन, आधुनिक उद्यमशीलतेमध्ये महाराजांच्या गुणांचा प्रभावी वापर कसा करता येईल, हे समजून घेण्याचा प्रयत्न या शोधनिबंधाद्वारे होईल.
- **स्टार्टअप्ससाठी मार्गदर्शन:** या संशोधनातून स्टार्टअप्सना यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींचा आणि कौशल्यांचा उलगडा होईल, ज्यामुळे त्यांचे मार्गदर्शन करण्यास मदत होईल.
- **नेतृत्व विकास:** महाराजांच्या नेतृत्त्वगुणांचा अभ्यास करून, नवीन नेतृत्व तत्त्वांचा विकास करण्यात मदत होईल, ज्यामुळे उद्योजकांना त्यांच्या व्यवसायात शाश्वत वाढ आणि विस्तारासाठी दिशादर्शन मिळेल.

'संकल्पनात्मक चौकट' संशोधन पद्धतीचा वापर मुख्यतः विविध घटकांमधील संबंधांचा अभ्यास करण्यासाठी केला जातो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्त्वगुणांचा आधुनिक स्टार्टअप्सवर प्रभाव कसा आहे, हे समजून घेण्यासाठी हा दृष्टिकोण उपयुक्त आहे.

**संकल्पनात्मक संशोधन पद्धतीच्या मर्यादा**

संकल्पनात्मक संशोधन पद्धती ही एक उपयुक्त पद्धत असली तरी, त्याच्या काही मर्यादा आहेत.

- **वास्तविकतेचे अंतर:** ऐतिहासिक संदर्भ आणि आधुनिक व्यवसाय वातावरण यांच्यामध्ये मोठे अंतर असते. महाराजांच्या काळातील राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती आजच्या स्टार्टअप इकोसिस्टमपेक्षा पूर्णपणे वेगळी होती. म्हणून, ऐतिहासिक तत्त्वांचे थेट प्रेरणाकरन करणे कठीण होऊ शकते.
- **सैद्धांतिक पक्षपातीपणा/पूर्वाग्रह:** संकल्पनात्मक संशोधनात, संशोधक आपल्या स्वतःच्या पूर्वधारणांच्या आधारे विश्लेषण करतात. यामुळे, निष्कर्षांमध्ये थोडाफार पक्षपात होण्याची शक्यता येणे नाकारु शकत नाही.

संकल्पनात्मक संशोधन पद्धतीच्या मर्यादा लक्षात घेऊन व त्या ओलांडून, आपण शोधनिबंधाच्या सीमांचे स्पष्ट स्वरूप तयार करू शकतो. वस्तुनिष्ठता सांभाळून निरीक्षण आणि विश्लेषणाच्या प्रक्रियेत वैयक्तिक पूर्वाग्रह, भावना किंवा मतं यांच्या प्रभावापासून मुक्त राहून संशोधनाची वैधता आणि विश्वासार्हता सुनिश्चित केली आहे. महाराजांच्या नेतृत्वगुणांचा आधुनिक स्टार्टअप्सच्या व्यवसाय वाढीसाठी कसा उपयोग होऊ शकतो, हे समजून घेण्यासाठी हा एक प्रभावी मार्ग आहे. या पद्धतीमुळे नवीन दृष्टिकोण, सैद्धांतिक आधार आणि अनुप्रयोगक्षमता मिळवता येते.

संकल्पनात्मक चौकट एक महत्त्वपूर्ण विश्लेषणात्मक तथा अन्वेषणात्मक साधन म्हणून वापरली जाते. ही चौकट महाराजांच्या नेतृत्वगुण आणि तत्त्वांच्या संदर्भात स्टार्टअप्स आणि त्यांच्या विस्तारासंबंधीच्या जटिल कल्पना आणि सिद्धांतांना शोधनिबंधाच्या परिपेक्षात तार्कीक मांडणी करण्यास लवचीकता प्रदान करते. यामुळे विषयाबद्दल एक सुसंगत विचार प्रक्रिया निर्माण झालेली दिसते *(Ravitch, S. M., 2011).*

**साहित्याचा आढावा**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आणि त्यांच्या युद्धनीतीवर अनेक नामांकित इतिहासकारांनी विस्तृत संशोधन केले आहे. या संशोधनात त्यांच्या नेतृत्वगुणांवर, रणनीतिक कौशल्यांवर आणि त्यांच्या यशस्वी मोहिमांच्या पाठीमागच्या नानावीध कारणांवर तथा पैलूंवर भर दिलेले आहे. स्टार्टअप्सच्या यशाचे घटक, नेतृत्व सिद्धांत आणि ऐतिहासिक नेतृत्वाची तत्त्वे आधुनिक व्यवसायात कसे लागू करता येतात, यावर चर्चा करून, महाराजांच्या गुणांचा आधुनिक उद्योजकतेवर प्रभाव साहित्याच्या आढाव्याद्वारे स्पष्ट केला आहे.

**जे स्टिव्ह ब्लँक आणि बॉब डॉर्फ -** *द स्टार्टअप ओनर्स मॅन्युअल: द स्टेप-बाय-स्टेप गाइड फॉर बिल्डिंग अ ग्रेट कंपनी*, हे पुस्तक स्टार्टअप्ससाठी एक महत्त्वपूर्ण मार्गदर्शक आहे, जे स्टिव्ह ब्लँक आणि बॉब डॉर्फ यांनी लिहिले आहे.

*द स्टार्टअप ओनर्स मॅन्युअल" आणि शिवाजी महाराजांच्या मोहिमांमधील सामायिक तत्त्वे:*

"द स्टार्टअप ओनर्स मॅन्युअल" हे पुस्तक स्टार्टअप्सच्या यशासाठी महत्त्वपूर्ण तत्त्वे मांडते. यात ग्राहक विकास मॉडेल, लीन स्टार्टअप तत्त्वे, आवर्तन प्रक्रिया आणि व्यवसाय मॉडेल कॅनव्हासचा समावेश आहे. ही तत्त्वे ग्राहकांच्या गरजा समजून घेणे, उत्पादनात व प्रक्रीयेत सतत सुधारणा करणे आणि व्यवसायाच्या रणनीती प्रभावीपणे विकसित करणे यावर भर देतात. *(ब्लँक, एस., & डॉर्फ, बी., 2020)*

आश्चर्यकारकपणे, ही तत्त्वे शिवाजी महाराजांच्या मोहिमांशी देखील संबंधित आहेत. शिवाजी महाराजांनी त्यांच्या काळातील लोकांच्या गरजा ओळखल्या आणि त्यांच्या संरक्षणासाठी लढा दिला. त्यांच्या मोहिमांमध्ये लवचिकता आणि आवर्तन प्रक्रिया महत्त्वपूर्ण होत्या.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

शिवाजी महाराजांनी त्यांच्या सैन्याची संरचना सुधारली आणि त्यांच्या रणनीतींमध्ये सतत बदल केले. त्यांच्या यशस्वी मोहिमांमध्ये सैनिकी गती, रणनिती आणि नेतृत्व हेही तितकेच महत्त्वाचे होते, जसे की स्टार्टअप्समध्ये संस्थापकांचे नेतृत्व आवश्यक असते."द स्टार्टअप ओनर्स च्या मॅन्युअल" मध्ये दिलेल्या तत्त्वांचा अभ्यास केल्यास, आजचे स्टार्टअप्स यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या गुणधर्मांची माहिती मिळते. शिवाजी महाराजांच्या जीवनातून मिळणारे धडे, आधुनिक उद्योजकांना प्रेरणा देऊ शकतात आणि त्यांना त्यांच्या स्टार्टअप्सचा विस्तार करण्यात मदत करू शकतात.

**दिपेश कर्माकर - अंडरस्टॅन्डींग द जिओग्राफिकल व्हीजन ऑफ छत्रपती शिवाजी महाराज**

छत्रपती शिवाजी महाराजांनी भू-भागाच्या नैसर्गिक ठेवणीच्या तांत्रिक वापरावर आधारित साम्राज्य पादाक्रांत केले. त्यांच्या काळातील शासकांनी युद्ध आणि करारांद्वारे भूभाग जिंकण्यावर लक्ष केंद्रित केले, परंतु महाराजांनी भौगोलिक परिस्थितीचा तथा सिमित संसाधनाचा विचार करून आपल्या लष्करी रणनीती विकसित केल्या. महाराजांनी समुद्री सामर्थ्यावर जोर दिला आणि भौगोलिक ज्ञानाचा वापर करून त्यांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार केला. त्यांनी किल्ले बांधले आणि व्यापार मार्गांचे संरक्षण केले, ज्यामुळे त्यांच्या साम्राज्याची स्थिरता वाढली. हे सर्व गुण आजच्या स्टार्टअप्ससाठी महत्त्वाचे आहेत.

**समुद्री सीमांचे दुर्लक्ष:** मुघलांसह भारतीय शासकांनी समुद्राला साम्राज्याचा भाग म्हणून दुर्लक्षित केले. या दुर्लक्षामुळे युरोपियन व्यापारी कंपन्यांना त्यांचा हेतू साकार करण्यात अपयश आले. या उलट महाराजांनी समुद्री व्यापार आणि संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण आणि व्यापक मोहिमा हाती घेऊन यशस्वी केल्या.

**शिवाजी महाराजांच्या भौगोलिक विजयांचे सारांश**

| प्रदेश | शिवाजी महाराजांनी केलेल्या कारवाया | महत्त्व |
|---|---|---|
| पुणे | पुणे आणि परिसरात शासन स्थापित केले | मराठा साम्राज्याचे केंद्र बनले |
| कोकण | कोकण प्रदेश जिंकला | समुद्री व्यापार आणि संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण |
| घाट | घाट प्रदेशांत किल्ले बांधले | लष्करी रणनीतीसाठी महत्त्वपूर्ण |
| दख्खन | दख्खन प्रदेशात विस्तार केला | राज्याची सीमा वाढवली |
| रायगड | रायगड किल्ला बांधला | मराठा साम्राज्याची राजधानी बनली |
| सिंधुदुर्ग | सिंधुदुर्ग किल्ला बांधला | समुद्री संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण |
| विजयदुर्ग | विजयदुर्ग किल्ला बांधला | समुद्री संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण |
| मालवण | मालवण किल्ला बांधला | समुद्री संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण |
| सूरत | सूरत बंदर नियंत्रित केले | आर्थिक शक्ती वाढवली |
| गोवा | गोव्यावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला | समुद्री वर्चस्व स्थापित करण्यासाठी महत्त्वपूर्ण |

***तक्ता क्र. १ - शिवाजी महाराजांच्या भौगोलिक विजयांचे सारांश***

- साम्राज्य बांधणीत संसाधन दृष्टिकोण: प्रादेशिक विस्तार सुरुवातीला संसाधन-केंद्रित दृष्टिकोणाशी संबंधित नव्हता. औद्योगिकीकरणादरम्यान जमीन संसाधनांचा साठा आहे या संकल्पनेला महत्त्व प्राप्त झाले. *(कर्माकर, डी. २०१३)*

**सायरस गोंडा आणि डॉ. नितीन परब- लीडरशिप लर्निंग फ्रॉम छत्रपती शिवाजी महाराज**

या पुस्तकातून शिवाजी महाराजांच्या जीवनातील विविध प्रसंगांचा उपयोग करून आधुनिक नेतृत्व क्षेत्रात एक अनमोल मार्गदर्शन प्रदान करते, याची मांडणी केली आहे. या पुस्तकात शिवाजी महाराजांच्या नेतृत्वगुणांचे सखोल विश्लेषण करून त्यांना आधुनिक नेतृत्व पद्धतींमध्ये कसा समावेश करता येईल हे स्पष्ट करण्यात आले आहे.

मुख्य विषय:

- **नैतिक नेतृत्व:** शिवाजी महाराजांनी नेहमीच नैतिक मूल्यांचे पालन करून नेतृत्व केले, ज्यामुळे त्यांच्या अनुयायांमध्ये अतूट विश्वास निर्माण झाला.
- **प्रेरणादायक नेतृत्व:** त्यांच्या कर्तृत्व आणि दृढ इच्छाशक्तीने त्यांनी अनुयायांमध्ये एक अनोखी प्रेरणा निर्माण केली.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

- **रणनीतिक दृष्टिकोण :** शिवाजी महाराजांनी प्रत्येक परिस्थितीचा बारकाईने अभ्यास करून त्यानुसार रणनीती आखली.
- **संसाधन व्यवस्थापन:** मर्यादित संसाधनांचा प्रभावी वापर करून त्यांनी आपले उद्दिष्ट साध्य केले.
- **अनुकूलन क्षमता:** बदलत्या परिस्थितीनुसार आपल्या रणनीतींमध्ये बदल करण्याची त्यांची क्षमता आजही प्रासंगिक आहे.

लेखकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या परिवर्तनात्मक नेतृत्व गुणांचा आढावा घेतला आहे आणि त्यांची सध्याच्या स्टार्टअप्ससाठी सुसंगतता मांडली जाऊ शकते, हे स्पष्ट केले आहे. महाराजांनी आपल्या अनुयायांमध्ये निष्ठा आणि प्रामाणिकता निर्माण करण्याच्या क्षमतेवर भर दिला. *(गोंडा, सी., & परब, एन., २०१३).* यातून स्टार्टअप्ससाठी एक महत्त्वपूर्ण धडा असा मिळतो की- व्यावसायिक वाढीसाठी एक वचनबद्ध टीम तयार करणे आवश्यक आहे. युद्धात त्यांनी भौगोलिक परिस्थितीचा केलेला कुशल वापर हा बाजारातील स्थिती समजून घेण्याचे महत्त्व दाखवतो, ज्यामुळे स्टार्टअप्सना स्वतःची स्थिती योग्य पद्धतीने निश्चित करता येईल.

**भारतातील स्टार्टअप परिदृश्य:**

भारतात स्टार्टअप इकोसिस्टमचा मोठा विस्तार होत आहे. सरकारच्या प्रोत्साहनामुळे आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे अनेक नवीन स्टार्टअप्स उद्योग सुरू करत आहेत. या क्षेत्रात फिनटेक, एडुटेक, हेल्थटेक आणि ई-कॉमर्स सारख्या क्षेत्रांमध्ये विशेषतः वाढ होताना दिसत आहे. भारतातील स्टार्टअप्स जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यास सक्षम आहेत आणि देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.

| **मापदंड** | **तपशील** |
|---|---|
| स्टार्टअप इंडिया रँकिंग | 'भारत' देश जागतिक स्तरावर तिसरा सर्वात मोठा स्टार्टअप इकोसिस्टम म्हणून उदयास आला आहे |
| स्टार्टअप्सची संख्या | ऑक्टोबर २०२३ पर्यंत ७६३ जिल्ह्यांमध्ये सुमारे १३००० मान्यताप्राप्त स्टार्टअप्स, ज्यामध्ये आयटी सेवा, आरोग्यसेवा, शिक्षण इत्यादी प्रमुख क्षेत्र आहेत |
| इनोवेशन गुणवत्ता रँकिंग | मध्यम उत्पन्न असलेल्या अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा वैज्ञानिक प्रकाशनांच्या गुणवत्तेत दुसरा क्रमांक आणि उच्च शिक्षण संस्थांच्या गुणवत्तेत तिसरा क्रमांक आहे |
| गेल्या वर्षांमध्ये वाढ | २०१५ मध्ये $०.५७ बिलियण पासून २०२२ मध्ये $८.४ Bn पर्यंत १५X ने निधी वाढला; २०१५ मध्ये १२०० पासून २०२२ मध्ये ९३०० हून अधिक गुंतवणूकदारांची संख्या ९X ने वाढली |
| युनिकॉर्न्स | ऑक्टोबर २०२३ पर्यंत १११ युनिकॉर्न्स, ज्यांचे एकूण मूल्यांकन $३४९.६७ बिलियण आहे; प्रमुख क्षेत्रांमध्ये SaaS, कन्ज्यूमर टेक, फिन-टेक, एडटेक, फूडटेक इत्यादी आहेत |
| वर्षानुवर्ष युनिकॉर्न ॲडिशन | २०२१: ४५ युनिकॉर्न्स, मूल्यांकन $१०२.३० Bn; २०२२: २२ युनिकॉर्न्स, मूल्यांकन $२९.२ बिलियण |
| डेकाकॉर्न्स | ५ डेकाकॉर्न्स: फ्लिपकार्ट, बायजू'स, न्यका, स्विगी, पेटीएम, ज्यांचे एकूण मूल्यांकन $११० बिलियण हून अधिक आहे |
| सरकारी समर्थन | स्टार्टअप इंडिया, क्रेडिट गारंटी फंड, अटल इनोवेशन मिशन इत्यादी योजना, ज्यांचा गेल्या ५ वर्षांमध्ये एकूण बजेट वाटप १२००० कोटी रुपयांहून अधिक आहे |
| इकोसिस्टम सक्षमकर्ते | १००% नफा कपात, १४ क्षेत्रांमध्ये PLI योजना, IP संरक्षण, पेटंट्स इत्यादींसाठी समर्थन असे कर लाभ |
| भौगोलिक स्तार/व्याप्ती | प्रमुख हब्स/केंद्रे: बेंगळुरू, दिल्ली एनसीआर आणि मुंबई; सर्व राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ७३६ जिल्ह्यांमध्ये उपस्थित स्टार्टअप्स |
| वार्षिक वाढ दर | दरवर्षी 12-15% वाढ अपेक्षित |

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

| | |
|---|---|
| तंत्रज्ञान-आधारित स्टार्टअप्स | सुमारे 8,900 – 9,300 तंत्रज्ञान आधारित स्टार्टअप्स |
| नवीन टेक स्टार्टअप्स (२०१९) | १३०० नवीन टेक स्टार्टअप्स, सरासरी २-३ स्टार्टअप्स दररोज तयार होतात |

*तक्ता क्र. २ - स्टार्टअप इंडिया सारांश* 1

भारताने जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकाची स्टार्टअप इकोसिस्टम म्हणून स्थान मिळवले आहे. ऑक्टोबर २०२३ पर्यंत ११३००० हून अधिक मान्यता प्राप्त स्टार्टअप्स ७६३ जिल्ह्यात कार्यरत आहेत. भारत वैज्ञानिक प्रकाशनांच्या गुणवत्तेत दुसऱ्या आणि उच्च शिक्षण संस्थांच्या गुणवत्तेत तिसऱ्या क्रमांकावर आहे. २०१५ मध्ये ०.५७ अब्ज डॉलर्सपासून २०२२ मध्ये ८.४ अब्ज डॉलर्सपर्यंत निधी १५ पट वाढला आहे. १११ युनिकॉर्न्स आणि ५ डेकाकॉर्न्स आहेत, ज्यात फ्लिपकार्ट, बायजूस, आणि नायका यांचा समावेश आहे. २०२१ मध्येच भारतात ४५ युनिकॉर्न्सची निर्मिती झाली, ज्यांची एकूण किंमत $१०२.३० अब्ज होती. पारंपारिक नसलेल्या क्षेत्रांमध्ये देखील युनिकॉर्न्सची निर्मिती झाली, ज्यामध्ये NBFCs, संवादात्मक संदेशवहन, क्रिप्टोकरन्सी एक्स्चेंजेस, D2C, आणि क्लाउड किचन्स यांचा समावेश होता. आज, जगातील प्रत्येक 10 युनिकॉर्न्सपैकी 1 युनिकॉर्न भारतात निर्माण झालेला आहे. [1]

**भारतीय स्टार्टअप इकोसिस्टम:**

भारतीय स्टार्टअप इकोसिस्टम अनेक आव्हानांचा सामना करताना दिसत आहे. सर्वात मोठे आव्हान म्हणजे पुरेसा निधी मिळवणे. अनेक स्टार्टअप्सला निधी उभारण्यात अडचणी येतात, ज्यामुळे त्यांची वाढ आणि नवकल्पना विकसित करण्यात अडथळा येतो. अनेक स्टार्टअप्स टिकाऊ उत्पन्न निर्माण करण्यात आणि व्यवहार्य व्यवसाय मॉडेल शोधण्यात अयशस्वी ठरतात. याशिवाय, मजबूत आधारभूत संरचनेचा अभाव, जसे की तंत्रज्ञान संसाधने आणि इन्क्युबेशन केंद्रे, त्यांच्या वाढीत जटीलता आणतात असे अनुभव आहेत. नियमितता प्रक्रीया व कर संरचना देखील एक मोठा अडथळा आहे. जटिल नियम व कर प्रक्रिया स्टार्टअप्स संचलनात कठीणता आणतात असा एक मतप्रवाह आहे. मोठ्या कंपन्यांशी स्पर्धा करणे आणि योग्य कौशल्य असलेल्या कर्मचाऱ्यांची कमतरता हीही प्रमुख समस्या म्हणून बघितली जाते. या आव्हानांवर मात करण्यासाठी, भारतीय सरकारने स्टार्टअप इंडिया सारख्या विविध उपक्रमांची घोषणा केली आहे. तथापि, या इकोसिस्टमला मजबूत करण्यासाठी स्टार्टअप्स, सरकार आणि इतर भागधारकांमध्ये अधिक सहकार्य आवश्यक आहे *(कृष्णमूर्ती, आर., 2023; नासकॉम., 2023; Eqvista. 2023; राथोड, एच., 2023)*

| आव्हान | तपशील |
|---|---|
| निधी आव्हान | पुरेसा निधी मिळवण्यातील अडचणी; मर्यादित भांडवलाची उपलब्धता, वाढ आणि नावीन्यतेला अडथळा आणते. |
| महसूल निर्माण संघर्ष | टिकाऊ महसूल निर्माण करण्यातील आणि व्यवहार्य व्यावसायिक मॉडेल शोधण्यातील आव्हाने; स्पर्धा आणि मर्यादित बाजार पोहोच यशाला अडथळा आणते. |
| सहायक पायाभूत सुविधांचा अभाव | अपर्याप्त भौतिक पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञान संसाधनांसाठी मर्यादित प्रवेश; अपर्याप्त इन्क्युबेशन सेंटर आणि मेंटरशिप कार्यक्रम. |
| नियमनकारी वातावरण | जटिल नियमनकारी अडथळे आणि कर संरचना; नोकरशाही लालफीतशाही आणि अस्पष्ट नियमन अडथळे निर्माण करतात. |
| स्थापित व्यावसायिक स्पर्धा | कॉर्पोरेट दिग्गजांकडून तीव्र स्पर्धा; स्थापित व्यावसायिक अनेकदा बाजारात खळबळ उडवतात, ज्यामुळे स्टार्टअप्स फुलणे कठीण होऊन बसते. |
| प्रतिभा संपादन आणि टिकवून ठेवणे | कौशल्यवान कर्मचारी शोधणे आणि टिकवून ठेवणे कठीण; प्रशिक्षित व्यावसायिकांची मागणी पुरवठ्यापेक्षा अधिक आहे. |

*तक्ता क्र. ३ -* भारतीय स्टार्टअप इकोसिस्टमचे आव्हान: सारांश तालिका 2

[1] Web sources link page - https://www.startupindia.gov.in/content/sih/en/international/go-to-market-guide/indian-startup-ecosystem.html
https://www.investindia.gov.in/indian-unicorn-landscape
https://www.makeinindia.com/startup-ecosystem-india

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

**छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती तत्वे आणि आधुनिक स्टार्टअप्स**

महाराजांची युद्धनीती, लष्करी नेतृत्व आणि स्वराज्य स्थापनेचे ध्येय हे केवळ ऐतिहासिक महत्त्वाचेच नाहीत तर आधुनिक व्यवस्थापन आणि उद्योजकतेसाठीही अत्यंत प्रासंगिक आहेत. महाराजांच्या युद्धनीतीतील नेतृत्वगुण व तत्त्वे आणि स्टार्टअप्सच्या वृद्धी करिता लागणारे कौशल्य यांच्यातील समांतरता शोधून काढण्या करिता उपयोजीत आहे.

आजच्या स्पर्धात्मक जगात, स्टार्टअप्सना दीर्घकालीन वाढ आणि टिकाऊपणा साधण्याकरिता अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते. ग्राहकांच्या गरजा समजून घेणे, तंत्रज्ञानाचा वापर करणे, आणि योग्य आणि प्रमाणबद्ध संसाधन व्यवस्थापन करणे ही काही प्रमुख आव्हाने आहेत. स्टार्टअप्सना त्यांच्या व्यवसायाच्या यशासाठी लवचिकता, नवकल्पना, आणि प्रभावी नेतृत्व आवश्यक आहे.

महाराजांची युद्धनीती आणि आधुनिक स्टार्टअप्स यांच्यात असलेली आश्चर्यकारक साम्ये हा या अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे. या दोन्ही क्षेत्रांमध्ये यशस्वी होण्यासाठी विशिष्ट नेतृत्त्वगुण, धोरणात्मक नियोजन आणि संसाधन व्यवस्थापन यांची आवश्यकता असते.

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीतील नेतृत्वगुण व तत्वे:**

महाराजांचे नेतृत्वगुण त्यांच्या युद्धनीतीत स्पष्टपणे दिसून येतात.

1. **दूरदृष्टी**: भविष्यातील परिस्थितीचा अंदाज घेण्याची क्षमता.
2. **लवचिकता**: बदलत्या परिस्थितीनुसार रणनीतीत बदल करण्याची क्षमता.
3. **निर्णयात्मकता**: त्वरित आणि प्रभावी निर्णय घेण्याची क्षमता.
4. **संसाधन व्यवस्थापन**: उपलब्ध संसाधनांचा प्रभावी उपयोग करण्याची क्षमता.
5. **कूटनीती:** शत्रूंशी आणि मित्रांशी कूटनीतिक संबंध प्रस्थापित करण्याची क्षमता.

**आधुनिक स्टार्टअप्स आणि त्यांची आवश्यकता:**

आजच्या स्पर्धात्मक जगात स्टार्टअप्सना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. यासाठी त्यांना महाराजांच्या नेतृत्व गुणांचा अभ्यास करणे उपयुक्त ठरू शकते.

- **दूरदृष्टी:** स्टार्टअप्सना भविष्यातील बाजारपेठेचा अंदाज घेऊन त्यानुसार उत्पादन किंवा सेवा विकसित कराव्या लागतात.
- **लवचिकता:** बदलत्या बाजारपेठेनुसार आपल्या उत्पादन किंवा सेवांमध्ये बदल करण्याची क्षमता आवश्यक असते.
- **नवीन तंत्रज्ञान:** स्टार्टअप्सना नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन क्षमता वाढवावी लागते.
- **नेटवर्किंग:** इतर उद्योजकांशी, गुंतवणूकदारांशी आणि ग्राहकांशी संबंध प्रस्थापित करणे महत्त्वाचे असते.
- **ग्राहक केंद्रित दृष्टिकोण:** ग्राहकांच्या गरजा समजून त्यांच्यानुसार उत्पादन किंवा सेवा पुरवणे आवश्यक असते.

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीती आणि आधुनिक स्टार्टअप्समधील साधर्म्य:**

| शिवाजी महाराजांची युद्धनीती | आधुनिक स्टार्टअप्स |
|---|---|
| **दूरदृष्टी** | भविष्यातील बाजारपेठेचा अंदाज |
| **लवचिकता** | बदलत्या परिस्थितीनुसार बदल करण्याची क्षमता |
| **सैन्यशास्त्र//गनिमीकावा** | नवीन तंत्रज्ञानाचा वापर |
| **कूटनीती** | नेटवर्किंग आणि भागीदारी |
| **प्रजाकल्पना** | ग्राहक केंद्रित दृष्टिकोण |

*तक्ता क्र. ४- महाराजांच्या युद्धनीती आणि आधुनिक स्टार्टअप्समधील साधर्म्य*

छत्रपती शिवाजी महाराजांचे नेतृत्वगुण आणि तत्त्वज्ञान आधुनिक स्टार्टअप्ससाठी एक अनमोल खजिना आहे. विशेषत: माहितीचा धोरणात्मक वापर, प्रभावी संवाद कौशल्य आणि अडचणींना सामोरे जाण्याची दृढ इच्छा या गुणांवर लक्ष केंद्रित केल्यास, महाराजांच्या जीवन प्रसंगातून अनेक महत्त्वपूर्ण धडे घेता येतात. त्यांनी कसे एका अस्थिर परिस्थितीत स्वतःला घडवून घेत, शक्तिशाली शत्रूंना पराभूत करून एक विस्तृत स्वराज्य उभारले, हे आधुनिक उद्योजकांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या नवकल्पनात्मक लष्करी

[2] *(कृष्णमूर्ती, आर., 2023;* नासकॉम., *2023; Eqvista. 2023;* रथोड, *एच., 2023)*

रणनीती, गुप्तचर यंत्रणेचा प्रभावी वापर आणि भू-राजकीय परिस्थितीची गहन समज या गोष्टींमधून स्टार्टअप्सना स्पर्धात्मक आणि बदलत्या व्यावसायिक वातावरणात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये शिकता येतील.

**स्टार्टअप्सचे यश – मूल्य कि मूल्यांकन:**

स्टार्टअप्सच्या अपयशाचे मुख्य कारण म्हणजे मूल्यनिर्मितीपेक्षा मूल्यांकनावर अधिक भर देणे. आजकालच्या स्टार्टअप्समध्ये फंडिंग मिळवणे, कंपनीचे मूल्यांकन वाढवणे आणि लवकरात लवकर युनिकॉर्न किंवा आपीओ (IPO) पर्यंत पोहोचणे हेच प्रमुख उद्दिष्ट ठरवून काम केले जाते. यामुळे व्यवसायाच्या शाश्वत विकासावर लक्ष कमी होते. पारंपारिक व्यवसायांनी स्थिरता प्राप्त करण्यासाठी अनेक वर्षे घेतली आणि आजही ते व्यवसायात टिकून आहेत. फक्त मूल्यांकनाच्या मागे न लागता, खऱ्या समस्यांचे समाधान करण्यावर लक्ष केंद्रित केल्यासच दीर्घकाळ टिकणारा व्यवसाय उभा राहू शकतो. "मूल्य-वर्धित विन्स द रेस" हेच या क्षेत्रात खरे ठरते. *(झ्रोच, एन. 2023)* छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीतीतील तत्त्वे ही मूल्यांवर आधारीत होती, ज्यात त्यांनी उत्कृष्ट नेतृत्व आणि रणनीतिक कौशल्यांसाठी, साम्राज्याच्या स्थापनेसाठी आणि विस्तारासाठी नाविन्यपूर्ण व प्रभावी रणनीती विकसित केल्या. महाराजांच्या युद्धनीतीतील निर्णायकता, योजनाबद्धता, स्मार्ट संसाधन व्यवस्थापन, नवीन तंत्रज्ञानाचा वापर, प्रेरणादायी नेतृत्व, शत्रूच्या चुकांचा फायदा घेणे, स्थानिक जाणीव आणि अनुकूलता या प्रमुख तत्त्वांचा स्वराज्य स्थापनेकरिता अवलंब केला. ही तत्वे आधुनिक स्टार्टअप्समध्ये अभ्यासाअंती अवलंबली पाहिजेत. ऐतिहासिक लष्करी रणनीती आणि वर्तमान व्यावसायिक व्यवहार यातील साम्य शोधून, धोरणात्मक व्यवस्थापन आणि नेतृत्वाविषयी नवीन दृष्टिकोनाचा स्वीकार ही मूल्य निर्मितीची प्रथम पायरी आहे, ज्यामुळे उद्योजक आणि व्यावसायिक व्यापाऱ्यांना त्यांच्या उपक्रमांचा विस्तार प्रभावीपणे करण्यासाठी महत्त्वपूर्ण अंतर्दृष्टी मिळू शकते.

| **तत्त्व** | **राजे शिवाजी महाराजांचा दृष्टिकोण** | **स्टार्टअप्ससाठी महत्त्व** |
|---|---|---|
| निर्णायकता (Decisiveness) | शिवाजी महाराजांनी निर्णय घेताना वेळ वाया घालवला नाही. | स्टार्टअप्समध्ये त्वरित निर्णय घेणे आवश्यक असते. |
| योजनाबद्धता(Strategic Planning) | प्रत्येक मोहिमेची योजना अतिशय काळजीपूर्वक आखली. | व्यवसायाची दीर्घकालीन योजना आखणे गरजेचे आहे. |
| स्मार्ट संसाधन व्यवस्थापन (Smart Resource Management) | उपलब्ध संसाधनांचा अत्यंत हुशारीने वापर केला. | मर्यादित संसाधनांचा जास्तीत जास्त परिणामकारक वापर करणे आवश्यक आहे. |
| नवीन तंत्रज्ञानाचा वापर (Adoption of New Technologies) | नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून युद्धकौशल्य वाढवले. | नवीन तंत्रज्ञान स्वीकारून व्यवसायाच्या वाढीस गती मिळवणे. |
| प्रेरणादायी नेतृत्व (Inspirational Leadership) | नेतृत्व प्रेरणादायी होते. | नेतृत्वाच्या माध्यमातून सहकाऱ्यांना प्रेरणा देणे. |
| शत्रूची चूक ओळखून फायदा घेणे (Exploiting Enemy's Mistakes) | शत्रूच्या चुकांचा फायदा घेत आपली रणनीती आखली. | स्पर्धकांच्या कमतरतांचा फायदा घेऊन योजना आखणे. |
| स्थानिक जाणीव आणि अनुकूलता (Local Awareness and Adaptability) | स्थानिक जाणीवांचा वापर करून मोहिमा यशस्वी केल्या. | स्थानिक बाजारपेठ आणि ग्राहकांच्या गरजा ओळखून योजना आखणे. |

*तक्ता क्र. ५* - मूल्य निर्मिती तत्वे

महाराजांची परिस्थितीनुसार बदलण्याची आणि नवकल्पना करण्याची क्षमता आजच्या वेगाने बदलणाऱ्या व्यवसाय वातावरणात आवश्यक असलेल्या चपळतेचे प्रतिबिंब आहे. हा अभ्यास संसाधन व्यवस्थापन आणि समुदायाच्या सहभागावर त्यांनी दिलेला भर, कार्यक्षमता आणि हितधारकांशी दृढ संबंध यांचे महत्त्व अधोरेखित करतो. या ऐतिहासिक धड्यांना नवउदयोजक त्यांच्या नेतृत्वाच्या चौकटीत समाविष्ट करून, स्टार्टअप्स 'स्वराज्य' या संकल्पनेतून 'स्केलअप' पर्यंत प्रभावीपणे संक्रमण करू शकतात, जेणेकरून स्टार्टअप्सना स्पर्धात्मक बाजारपेठेत शाश्वत वृद्धी आणि यश मिळण्याच्या मार्गावर अग्रसर राहण्यात यश संपादन करता येईल.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

**निष्कर्ष**

या शोधनिबंधाच्या माध्यमातून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वगुणांची आधुनिक काळात प्रासंगिकता समजून घेऊन, त्यांचा वापर करून स्टार्टअप्सना अधिक यशस्वी बनवण्यासाठी काय प्रयत्न केले जाऊ शकतात हे समजून घेता येईल.

हे संशोधन आधुनिक उद्योजकांना त्यांच्या व्यवसायात स्थिरता आणि यश साधण्यासाठी एक ऐतिहासिक दृष्टिकोण प्रदान करेल. महाराजांच्या नेतृत्वगुण व तत्त्वांचा वापर करून, आजचे उद्योजक त्यांच्या स्टार्टअप्सच्या विस्तारासाठी अधिक सुदृढ आणि टिकाऊ धोरणे विकसित करू शकतील.छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातून स्टार्टअप मालकांसाठी एक महत्त्वाचा व्यवसायिक धडा घेण्यासारखा आहे. त्यांनी आयुष्यभर मूल्यांसाठी केलेल्या संघर्षाने स्वराज्याचे मूल्य शिखरावर पोहचले. स्टार्टअप मालकांनीही मूल्य निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करावे.स्टार्टअप्सना सुरुवातीच्या टप्प्यापासूनच ग्राहकांसाठी आणि समाजासाठी मूल्य निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जेव्हा खरे मूल्य निर्माण होते, तेव्हा स्टार्टअपचे मूल्यांकन स्वतःहून वाढते. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करताना न्याय, समानता आणि स्वातंत्र्य या मूल्यांवर भर दिला होता. त्यामुळेच त्यांचे राज्य टिकून राहिले आणि वाढले. स्टार्टअप्सना व्यवसाय टिकवायचा आणि युनीकॉर्ण मध्ये आणायचा असेल तर छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे मूल्य निर्मिती वर भर द्यावा लागेल.

**संदर्भ/References**


1. Desai, R. R. (2024, August 3). Shivaji: Indian king. Britannica. https://www.britannica.com/biography/Shivaji
2. देसाई, आर. आर. (2024, अगस्त 3). शिवाजी: इंडियन किंग. ब्रिटानिका. https://www.britannica.com/biography/Shivaji
3. Grant, M. (2024, August 14). What a startup is and what's involved in getting one off the ground. Investopedia. https://www.investopedia.com/terms/s/startup.asp
4. ग्रांट, एम. (2024, अगस्त 14). व्हाट अ स्टार्टअप इज़ एंड व्हाट्स इन्वॉल्वड इन गेटिंग वन ऑफ द ग्राउंड. इन्वेस्टोपेडिया. https://www.investopedia.com/terms/s/startup.asp
5. Ravitch, S. M. (2011). Reason & Rigor: How Conceptual Frameworks Guide Research. SAGE Publications Inc.
6. राविच, एस. एम. (2011). रीज़न & रिगर: हाउ कंसेप्चुअल फ्रेमवर्क्स गाइड रिसर्च. साज पब्लिकेशन्स इंक.
7. Blank, S., & Dorf, B. (2020). *The Startup Owner's Manual: The Step-by-Step Guide for Building a Great Company* (1st ed.). Wiley. ISBN 978-1119690689.
8. ब्लँक, एस., & डॉर्फ, बी. (2020). *द स्टार्टअप ओनर्स मॅन्युअल: द स्टेप-बाय-स्टेप गाईड फॉर बिल्डिंग अ ग्रेट कंपनी* (1ले आवृत्ती). विली. ISBN 978-1119690689.
9. Karmarkar, D. (2013). Understanding the geographical vision of Chhatrapati Shivaji Maharaj. Online International Interdisciplinary Research Journal (Bi-Monthly), 3(4), 41-45. Retrieved from ResearchGate
10. कर्माकर, डी. (2013). अंडरस्टॅन्डींग द जिओग्राफिकल व्हीजन ऑफ छत्रपती शिवाजी महाराज. ऑनलाइन इंटरडिसिप्लिनरी रिसर्च जर्नल (बाय-मंथली), 3(4), 41-45. रिट्रीव्हड फ्रॉम रिसर्चगेट
11. Gonda, C., & Parab, N. (2013). Leadership learning from Chhatrapati Shivaji Maharaj. Embassy Books.
12. गोंडा, C., & परब, N. (2013). लीडरशिप लर्निंग फ्रॉम छत्रपती शिवाजी महाराज. एंबेसी बुक्स.
13. Krishnamurthy, R. (2023, January 31). *Economic survey 2022-23: Indian startup ecosystem faces several challenges, causing companies to flip*. Down to Earth. https://www.downtoearth.org.in/governance/economic-survey-2022-23-indian-startup-ecosystem-faces-several-challenges-causing-companies-to-flip--87400
14. कृष्णमूर्ती, आर. (2023, जनवरी 31). इकॉनॉमिक सर्वे 2022-23: इंडियन स्टार्टअप इकोसिस्टम फेसिस सेवरल चॅलेंजेस, कॉजिंग कंपनीज टू फ्लिप. डाउन टू अर्थ. https://www.downtoearth.org.in/governance/economic-survey-2022-23-indian-startup-ecosystem-faces-several-challenges-causing-companies-to-flip--87400
15. NASSCOM. (2023). Weathering the challenges: The Indian tech start-up landscape report 2023. https://nasscom.in/knowledge-center/publications/weathering-challenges-indian-tech-start-landscape-report-2023#
16. नासकॉम. (2023). वेदरिंग द चॅलेंजेस: द इंडियन टेक स्टार्ट-अप लँडस्केप रिपोर्ट 2023. https://nasscom.in/knowledge-center/publications/weathering-challenges-indian-tech-start-landscape-report-2023#
17. Eqvista. (2023). *The startup ecosystem in India: Trends, challenges, and opportunities for entrepreneurs*. Eqvista. https://eqvista.com/startup-fundraising/startup-ecosystem-india/
18. Eqvista. (2023). द स्टार्टअप ईकोसिस्टम इन इंडिया: ट्रेंड्स, चॅलेंजेस, अँड ऑपॉर्च्युनिटीज फॉर आंत्रप्रेन्युअर्स. Eqvista. https://eqvista.com/startup-fundraising/startup-ecosystem-india/

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

19. Rathod, H. (2023, July 11). *How India is becoming a global startup hub: The challenges and opportunities ahead*. Times of India. https://timesofindia.indiatimes.com/readersblog/hiren/how-india-is-becoming-a-global-startup-hub-the-challenges-and-opportunities-ahead-56233/
20. रथोड, एच. (2023, जुलाई 11). हाऊ इंडिया इस बेकमिंग अ ग्लोबल स्टार्टअप हब: द चॅलेंजेस अँड ऑपॉर्च्युनिटीज अहेड. टाइम्स ऑफ इंडिया. https://timesofindia.indiatimes.com/readersblog/hiren/how-india-is-becoming-a-global-startup-hub-the-challenges-and-opportunities-ahead-56233/
21. Droch, N. (2023, August 6). Startup kyu fail ho jate hai ft Uttam Banerjee (Zerodor) | ShalluNisha podcast [Video]. YouTube. https://www.youtube.com/watch?v=MlTa5SSVXPI
22. ड्रोच, एन. (2023, अगस्त 6). स्टार्टअप क्यू फेल हो जाते है ft उत्तम बैनर्जी (ज़ेरोडोर) | शल्लुनिशा पॉडकास्ट [वीडियो]. यूट्यूब. https://www.youtube.com/watch?v=MlTa5SSVXPI

**ग्रंथसूची/Bibliography**

1. Chattrapati Shivaji Maharaj: Unkown Warfare Tactics (Hindi Edition) by Rushikesh K.
2. The Legacy of Shivaji the Great: Military Strategy, Naval Supremacy, and the Maratha Empire by Col. Anil Athale
3. Funding Your Startup and Other Nightmare: And Other Nightmares by Dhruv Nath and Sushanto Mitra
4. Master Growth Hacking: The best Kept Secret of New-Age Indian Start-Ups by Apurva Chamaria and Gaurav Kakkar